प्रेसनोट दि.24.03.2024

ठाणेनगर पोलीस ठाणे - मनाई आदेश भंग

आरोपी अफसर इक्बाल पिंजारी, वय 28 वर्षे, रा.महागिरी, ठाणे पश्चिम यास पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-1, ठाणे यांनी ठाणे, मुंबई उपनगर, पालघर आणि रायगड जिल्हा या महसुली हद्दीतुन एक दोन वर्ष कालावधीकरिता हद्दपार करण्याचे आदेश, दि.12.05.2023 अन्वये दिले होते. परंतू सदर आरोपी याने त्यास सदर महसुली जिल्हयामध्ये मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-1, ठाणे यांचे परवानगीशिवाय प्रवेश करण्यास मनाई असताना सदर मनाई आदेशाचा भंग करून, दि.23.03.2024 रोजी 23.25 वा. चे सुमारास, सुर्या मिलजवळ सार्वजिनक रोडवर, ठाणे पश्चिम येथे ठाणेनगर पोलीस ठाणेचे पथकास मिळुन आला. सदर प्रकाराबाबत सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादी वरून आरोपीविरूध्द गुन्हा रजि. नं. ।। 345/2024 महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 142 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपी अफसर इक्बाल पिंजारी, वय 28 वर्षे यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोना/2569 पाटील हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,

पोलीस आयुक्तालय,

ठाणे शहर